One Page Note on Modus Operandi

पवई पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ७६७/२०२६ कलम ३१८(४), ३१९(२) भारतीय न्याय संहिता या गुन्हयात अदयाप पर्यंत एकूण १० आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. कॉलसेंटर चालक हे विविध बोगस सिम कार्ड हे त्याने नेमलेल्या सिमकार्ड डिलर कडून विकत घेत होते.

त्यानंतर अटक आरोपी हे प्रत्येक सिमकार्डचा वापर करुन त्यांचे मोबाईल मध्ये बनावट नावाने इन्स्टाग्राम व फेसबुक अकाउंट तयार करत होते. सदर सोशल मिडीयाच्या माध्यमातून जाहीराती द्वारे प्रवेश घेण्यास इच्छूक विदयार्थी व पालकांचे मोबाईल नंबर प्राप्त करीत असत. त्यातील इंजिनिअरींगच्या व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास इच्छुक पालक व विदयार्थी यांना संपर्क साधून त्यांचा विश्वास संपादन करत असत.

त्यानंतर सदर कॉलसेंटर चालक व त्याचे साथीदार हे व्हॉटस ॲप बिझनेस अकाउंट वरुन सदर पालक/विदयार्थी यांना PICT (Pune Institute of Computer Technology), NSUTI (Netaji Subhash Chandra University of Technology), DTU (Delhi Technological University) या व्यतिरीक्त सुध्दा अन्य कॉलेज मध्ये NRI कोटा, मॅनेजमेंट कोटा यातून ॲडमिशन मिळवून देतो या बहाण्याखाली व्हॉटस ॲप चॅटच्या माध्यमातून, पालक/विदयार्थी ज्या शिक्षण संस्थेत प्रवेश घेण्यास इच्छुक आहेत त्या शिक्षण संस्थेच्या कॅम्पस/परिसरात भेट घेवून शिक्षण संस्थेच्या प्रशासनात आपली ओळख आहे असा बनाव करुन सदर आरोपी इसम हे विदयार्थी/पालक यांच्या समोर दिखावा करत असेत.

सदर दिखाव्याला भुलून पालक व विदयार्थी त्यांना बळी पडून ॲडमिशन मिळेल या विश्वासापोटी त्यांच्यावर विश्वास ठेवत असत. सदर विश्वासाचा गैरफायदा घेत नमूद आरोपी हे पालक/ विदयार्थी यांच्याकडून टोकन अमाउंट, ॲडवान्स/प्रथम वर्षाची शैक्षणिक फी या नावाखाली बहुधा रोख स्वरुपात व जे पालक/विदयार्थी रोख रक्कम दयावयास तयार नाहीत त्यांच्याकडून कोटक बँकेच्या एका बँक खात्यात रक्कम स्वीकारत असत.

त्यानंतर सदर खात्यात जमा झालेली रक्कम ही नमूद बँक खात्याचा वापरकर्ता (ऑपरेटर) हा एटीएम विथड्रॉल, पी.ओ.एस. स्वाईप मशिनच्या माध्यमातून तसेच रोख स्वरुपात स्वीकारत असे.

त्यानंतर सदर आरोपी कॉलसेंटर चालक व कॉलर हे ज्यावेळी संबंधीत कॉलेजची प्रवेश प्रक्रियेची यादी जाहीर होण्यापूर्वी मोबाईल व सिमकार्ड नष्ट करुन पसार होत असत.

सदर आरोपी हे शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस ॲडमीशन कालावधीत कार्यरत असत. सदर ॲडमिशनची प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच त्यांचे कॉल सेंटर बंद करुन पसार होत असत.

यावर्षी सदर बाबत पवई पोलीस ठाणे येथे फिर्यादी यांची फसवणूक झाल्याच्या प्राप्त तक्रारीची तात्काळ दखल घेत सदर आरोपी यांचे विविध मोबाईल नंबर, रोख रक्कम स्वीकारण्याकरीता वेगवेगळया ठिकाणी बिर्लींग करीता पुरविलेले मोबाईल नंबर यांचे एकत्रित तांत्रिक विश्लेषणातून सदरचे नंबर हे संपूर्ण भारतात फसवणूक करीत आहेत याबद्दल खात्री झाली. त्यानंतर सदर क्रमांकावर सुमारे महिनाभर सलग तांत्रिक पाळत ठेवून त्यांच्या हालचाली व ठाव ठिकाणे यांची माहिती प्राप्त करुन गोपनीय रित्या पुणे येथील संशयीत ठिकाणांवर दोन वेळा पथक पाठवून संशयीत इसमांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

नमूद आरोपी हे गुन्हा करण्याकरीता वापरण्यात येणारे मोबाईल, सिम कार्ड हे इतर कोणत्याही व्यवहारासाठी वापरत नसत. तसेच त्यांचे वैयक्तीक मोबाईल वरुन कधीही फसवणूक करीता कॉल करीत नसत किंवा फसवणूकीकरीता वापरलेल्या मोबाईल वरुन त्यांची ओळख उघड होईल असे कोणतेही कृत्य करीत नसत.

तरी देखील फिर्यादीकडून उपलब्ध माहितीच्या आधारे तांत्रिक तपास व गोपनीय तपासाच्या आधारे पुणे येथील त्यांचा ठावठिकाणा प्राप्त करुन सदर सर्व आरोपी हे एकाच ठिकाणी आहेत ही खात्री झाल्यानंतर स्थानिक पोलीसांच्या मदतीने व पवई पोलीस ठाणे येथील कार्यरत तपास पथक यांना पाठवून सदर कॉल सेंटर मध्ये काम करणारे सर्व संशयीतांना ताब्यात घेण्यात आले.

वर नमूद आरोपीतांपैकी ४ आरोपी हे बिहार राज्यातील, ४ आरोपी हे उत्तर प्रदेश राज्यातील, १ हरियाणा राज्यातील व १ झारखंड राज्यातील मूळ रहिवासी आहेत. सदर आरोपी हे प्रवेश प्रक्रिया कालावधी संपताच त्यांच्या मूळ राज्यात परत जात असत.

सदर कॉलर हे जितके जास्त व्यक्तींचा विश्वास संपादन करुन त्यांच्याकडून प्रवेशाच्या नावाखाली रक्कम उकळण्यास मदत करत त्या फसवणूकीच्या रक्कमेवर कॉलर यांना त्यांचा मोबदला (इनसेंटीव्ह) मिळत असत. सदर कॉलर तरुण हे उच्च शिक्षीत असुन त्यांनी एम.आय.टी कॉलेज पुणे, SYMBIOSIS कॉलेज पुणे, सिंहगड कॉलेज पुणे, भारती विदयापीठ पुणे, एन.आय.यु. कॉलेज ग्रेटर नोएडा, नोएडा इंटरनॅशनल युनीवर्सीटी, गलगोटीया युनीवर्सीटी ग्रेटर नोएडा, सी.आय.टेक बॅंगलोर अशा नामांकित शिक्षण संस्थेतून पदवीधर असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.